आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात प्रशिक्षण कार्यक्रमासाठी "यशदा" पुणे यांना निधी उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्र. आव्यप्र-२०१८/प्र.क्र.११४/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि. २९.०३.२०१९.

शासन निर्णयः-

संचालक आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा यांनी पुढील वर्षात घ्यावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अग्रीम म्हणून रू. ७५,००,०००/- (रूपये पंच्याहत्तर लक्ष फक्त) एवढा निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. प्रशिक्षणाच्या १) क्षमताबांधणी (Capacity Building) २) आपत्ती निवारणाबाबत जनजागृती ३) आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा तयार करणे ४) आपत्ती व्यवस्थापनाबाबतची रंगीत तालिम इत्यादी बाबींसंदर्भात राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून दोन आठवडयाच्या आत सविस्तर प्रशिक्षण आराखडा देण्यात येईल. त्यानुसारच प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात यावे. अन्यथा निधीचे उपयोगिता (Utilization) ग्राहय समजण्यात येणार नाही.

३. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सविस्तर प्रशिक्षण आराखडा देण्यात आल्यानंतर प्रशिक्षणाचा सर्व कार्यक्रम सचिव (मदत व पुर्नवसन) यांची पूर्व मान्यता घेऊन अंतिम करण्यात यावा.

४. वरील निधी आहरित करण्यासाठी श्रीमती वनिता बावीस्कर, लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग आणि श्रीमती राजश्री राऊत, वित्तीय सल्लागार व सहसचिव यांना अनुक्रमे आहरण व संवितरण आधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. याकामी होणारा खर्च लेखाशीर्ष मागणी क्रमांक सी ६ २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ८० सर्वसाधारण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना, ००२ संचालन व प्रशासन (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (०१) (०१) महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधनसामुग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५१७६१) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या शीर्षाखाली चालू आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०३३०१४५५१५८२१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.03.30 14:57:43 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महासंचालक, यशदा पुणे
२. वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
३. महालेखाकार (महाराष्ट्र-१) मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. वि.स. व स.स आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
६. लेखाधिकार, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवडनस्ती.